## 🪔 रंगदीप २०१८ साठी साहित्य आणि जाहिरात आवाहन 🪔

**नमस्कार मंडळी ,**

*दिवाळी सण मोठा! नाही आनंदा तोटा!! आणि यावर्षी तर आमच्या आनंदाला अगदी उधाण आलं आहे.. अर्थात कारणही तसंच आहे...*

"मराठी विश्व न्यू जर्सी" आणि "महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क" यांच्यातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या रंगदीप दिवाळी अंकाला यावर्षी २८ वर्षे आणि "मराठी विश्व न्यू जर्सी" या संस्थेला यंदा "चाळीस वर्षे" पूर्ण होत आहेत, ही यशस्वी वाटचाल सांगताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. अर्थातच, या यशामधे तुम्हा सर्वांचा सिंहाचा वाटा आहे. तर या अत्यंत महत्वाच्या टप्प्यावर, आपणा सर्वांच्या साथीने दिवाळी साजरी करण्यासाठी आम्ही प्रचंड उत्साहाने व नव्या जोमाने तयारीला लागलो आहोत आणि म्हणूनच आम्हीः

संपादिका - रश्मी मुंगळे-उऱ्हेकर, सहसंपादिका - ईश्वरी पर्वते आणि रंगदीप २०१८ समितीः देशविदेशात स्थायिक झालेल्या लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकार यांना दर्जेदार व अभिरूचिसंपन्न साहित्य आणि कलाकृती पाठवण्यासाठी आवाहन करीत आहोत.

यावर्षीच्या अंकाचा विषय आहे *"चाळीशी"*. मानवी जीवनात चाळीशी हा महत्वाचा मानला जाणारा टप्पा... तारूण्यातून वार्धक्याकडे जातानाच्या वाटेवरचा उंबरठा... नृसिंह अवस्थाच जणू... चांगल्या वाईट, कडू गोड सर्व प्रकारच्या अनुभवांची शिदोरी घेऊन आयुष्याकडे बघण्याचा नवा दृष्टीकोन... आजवर, हे करायच राहून गेलं; ते राहून गेलं असं रडगाणं गाण्यापेक्षा, सकारात्मकतेने, नव्या उमेदीने, आणि धडाडीने पुढील आयुष्याला आनंदाने सामोर जाणं, वर्तमानाला celebrate करणं हेच उत्तम.. म्हणतात ना!! जगण्याची खरी मजा तर चाळीशीनंतरच सुरु होते!!! तर यावर्षीचा आपला अंक ह्याच विषयाला समर्पित असणार आहे.

या विषयावर आधारित विविध साहित्यः लेख, कथा, विडंबन, कविता, हास्य कविता, संस्मरण, प्रवास वर्णन, छायाचित्र अथवा रेखाटन इत्यादी कुठल्याही स्वरुपात तुम्ही पाठवू शकता. *विषयेतर साहित्य सुद्धा स्वागतार्ह आहे.*

***याशिवाय, खालील मनोरंजक व खुसखुशीत सदरं तर असणारचं आहेत!!!***

**पाककौशल्य** - सणावारांशी संलग्न असणाऱ्या खास पारंपारिक महाराष्ट्रीय पाककृती अथवा तुमची आवडती नाविन्यपूर्ण पाककृती तुम्ही या सदरांत पाठवू शक्ता.

**वेगळया वाटा** - विविध विषयांमधे लक्षणीय कामगिरी करुन इथल्या मातीत मराठी झेंडा रोवणाऱ्या व आपली कीर्ती वृद्धिंगत करणाऱ्या *"मराठी व्यक्तींविषयी"* जाणून घेण्यासाठी हे दालन यावर्षी खास खुले केले आहे.

**नवदीप** - यावर्षी देखील आपल्या अंकात हा छोटासा इंग्रजी विभाग ठेवला आहे. नव्या पिढीतील तरुण वर्गास काही लिहायचे, व्यक्त करायचे असल्यास ही एक उत्तम संधी राहील.

***आपल्या मराठमोळया संस्कृतीची अमराठी वाचकांना ओळख करुन देणाऱ्या लेखांचे या विभागात विशेष स्वागत आहे.***

रंगदीप २०१८

**शब्दकोडे स्पर्धा -** सुषमा येरवडेकर यांनी तयार केलेले शब्दकोडे व स्पर्धेचे नियम *www.marathivishwa.org* आणि *MMNY.online*

या संकेतस्थळांवर लवकरच उपलब्ध करण्यात येतील.

**जाहिरात व शुभेच्छा संदेशांसाठी संपर्क** - *अतुल आठवले (MVNJ) 617-233-2399 atulathavaleaa@gmail.com आणि*

***.................(MMNY).......................***

**साहित्याविषयी महत्वपूर्ण बाबी याप्रमाणे:**

आपले साहित्य पूर्व प्रकाशित नसावे.

मराठी टंकलेखनासाठी फक्त खालील फॉन्ट वापरावा.

**(फॉन्ट डाउनलोड करण्यासाठी येथे क्लीक करावे). किंवा (डाउनलोड करण्यासाठी फॉन्ट इ मेल मधे जोडलेला आहे).**

*अन्य कोणताही फॉन्ट वापरुन केलेले लेखन स्विकारले जाणार नाही.*

शब्दमर्यादा: कथा, लेख इत्यादी १५०० शब्द

पाककृती ३०० शब्द आणि विनोद किंवा चुटके १५० शब्द

कविता २० ओळी *(प्रत्येकी फक्त एकच कविता पाठवणे अपेक्षित आहे)*

मुखपृष्ठ हे चित्र किंवा रेखाटन या स्वरूपात आणि ८”*११” चे असावे.

**(मंडळाच्या सभासदांनी पाठवलेल्या चित्रांना विशेष प्राधान्य देण्यात येईल).**

साहित्याबरोबर आपले पूर्ण नाव, पत्ता, संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, ई पत्ता (email ID) पाठवणे आवश्यकआहे.

साहित्याची निवड व निवडलेल्या साहित्यात आवश्यकते बदल करण्याचे हक्क संपादकांकडे असतील आणि त्यांचा निर्णय अंतिम राहील.

तुमचे सर्व साहित्य *rangadeep.editor@marathivishwa.org* ला पाठवावे.

*साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख सोमवार, १ ऑक्टोबर २०१८ आहे याची कृपया नोंद घ्यावी.*

***धन्यवाद,***

***संपादिका -रश्मी मुंगळे उन्हेकर, सहसंपादिका -ईश्वरी पर्वते आणि रंगदिप समिती २०१८..***